RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ५२] बुधवार, जून २४, २०२०/आषाढ ३, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १९ जून, २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक एमपीएल ०७१७/प्र.क्र.२१४(भाग-१)/राउशु-३,---ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई मळी नियम, १९५५ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (ब) नुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे महाराष्ट्र शासन, मुंबई मळी नियम, १९५५ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :----

१. या नियमांना, मुंबई मळी नियम (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई मळी नियम, १९५५ च्या नियम १३ ( यापुढे ज्याचा उल्लेख "मूळ नियम" असा केलेला आहे), च्या पोट-नियम (१) मध्ये "रुपये पाच हजार" या शब्दांऐवजी "रुपये पन्नास" असे वाचण्यात यावे.

३. प्रधान नियमातील नियम १५ च्या पोट-नियम (१) मध्ये "रुपये पाच हजार" या शब्दाऐवजी "रुपये पन्नास" असे वाचण्यात यावे.

४. प्रधान नियमातील नियम १९ च्या पोट-नियम (१) मध्ये,----

(अ) "वाहतूक करण्यात यावयाच्या मळीच्या प्रत्येक मेट्रीक टना मागे रुपये पाचशे" या शब्दाऐवजी "वाहतूक करण्यात यावयाच्या मळीच्या प्रत्येक मेट्रीक टना मागे रुपये एक" असे वाचण्यात यावे.

(ब) परंतुक वगळण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वल्सा नायर सिंह,**
शासनाच्या प्रधान सचिव

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 19th June 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MPL-0717/C.R.214 (Part-1)/ Exc-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that, the following rules further to amend the Bombay Molasses Rules, 1955 shall be brought into force at once, and therefore, the rules shall be made without previous publication as provided by the proviso to sub -section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) and of other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Molasses (Amendment) Rules, 2020.

2. In rule 13 of the Bombay Molasses Rules, 1955 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*1*), for the words "of rupees five thousand" the words "of rupees fifty" shall be substituted.

3. In rule 15 of the principal Rules, in sub-rule (*1*), for the words "of rupees five thousand" the words "of rupees fifty" shall be substituted.

4. In rule 19 of the principal Rules, in sub-rule (*1*),—

(a) for the words "at the rate of rupees five hundred per metric ton of molasses to be transported" the words "at the rate of rupees one per metric ton of molasses to be transported" shall be substituted;

(b) proviso shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VALSA NAIR SINGH,
**Principle Secretary to Government.**

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.